**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 2, Feb- 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 01/02/2021 Accepted on : 14/02/2021 Publication Date: 15/02/2021

# तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचा अभ्यास

**[1] लोणारे किर्तीराज चंद्रभानजी, [2] डॉ. संघमित्रा ना. गोणारकर**
[1] संशोधक, शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, महाराष्ट्र राज्य
Email - lonarekc09@gmail.com
[2] मार्गदर्शिका, प्राचार्या, सावित्रीबाई फुले महिला अध्यापक महाविद्यालय, नांदेड

सार-संक्षेप: अनेक सद्गुणांचा एकात्म समुच्चय म्हणजे मानवता होय. माणसाने माणसांशी माणसांप्रमाणे वागावे यालाच मानवतावाद म्हणतात. तथागत बुद्धांनी तत्कालिन काळात मानवतावादी मूल्यशिक्षणाचा उपदेश दिला होता. तो उपदेश पालि पकासो या इयत्ता 12वीच्या पालि भाषेच्या पाठ्यपुस्तकात आहे. आधुनिक काळातील लोकशाहीमध्ये असलेली मूल्यांची रूजवणूक त्या पाठामधून केली जाते. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या चतु:सुत्रीचा विचार करता ही चारही मूल्ये तथागत बुद्धाच्या शिकवणुकीतून भारतीय संविधानात प्रतिबिंबीत झालेली दिसतात. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीला पूरक असलेली ही मूल्ये पाठ्यपुस्तकातून शिकविली जातात. या मूल्यांची रूजवणूक शाळेत शिक्षकांकडून होत असते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी मूल्यांची रूजवणूक करणे ही शिक्षकांची एक मोठी जबाबदारीच आहे.
बीज शब्द : संकेतशब्द- तथागत बुद्ध, मानवतावाद, मूल्यशिक्षण, उच्च माध्यमिक स्तर.

## प्रस्तावना:

पृथ्वीतलावर मानव हा सर्वात उत्क्रांत प्राणी आहे. शारीरिक गरजांबरोबरच त्याच्या मनाच्या गरजा भागणे, मन संपन्न व समर्थ होणे तितकेच आवश्यक असते. मानवी जीवनाला जीवनमूल्ये ही अर्थ प्रदान करतात व समाज आणि राष्ट्राचेही कल्याण साधतात. मानवी व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास हे शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी मूल्यशिक्षण अत्यावश्यक आहे. 2600 वर्षापूर्वी तथागत बुद्धांनी त्यांच्या मानवतावादी उपदेशातून तत्कालिन जनतेचे कल्याण केले होते. हे उपदेश मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणून जगातील अनेक देशांनी स्वीकारले आहे. तसेच अनेक देश हे तत्त्वज्ञान आजही स्वीकारत आहे. विविध ज्ञानशाखेमध्ये यावर संशोधन होत आहेत. जीवनाच्या प्रत्येक बाबीवर, समस्येवर तथागतांनी सखोल मार्गदर्शन केल्याचे उपदेश पालि भाषेतील साहित्यामध्ये दिसून येतात. यामध्ये सत्य, अहिंसा, अस्तेय, मैत्री, करूणा, प्रयत्नवाद, सेवाभाव, देशप्रेम, सामाजिक न्याय, व मानवता आढळून येते. आधुनिक काळात भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय ही चार मूल्ये इयत्ता 12वीच्या पालि पकासो या महाराष्ट्र राज्याच्या पाठयपुस्तकातील विविध पाठांमधून दिसतात. शिक्षक आपल्या अध्यापनातून विद्यार्थ्यांना या मूल्यांची रूजवणूक करतात. ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात रूजलीत याची पडताळणी करण्यासाठी प्रस्तुत संशोधन केले आहे.

## संबधित साहित्याचा आढावा :

1) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वाडमयातून प्रतीत होणारे मूल्यशिक्षणविषयक विचार- एक चिकित्सक अभ्यास
संशोधक: पाईकराव किरण शिवाजीराव., मार्गदर्शक: डॉ.राऊत ए.आर. वर्ष- मे 2016.
विद्यापीठ: शिक्षणशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

2) Valus of co-curricular activities as perceived by Higher Secondary Students.
Researcher: Sunith Kumar, G N. Guide : Arockiasamy, S. Year Sept.2006.
University: Department of Ecucation, Manonmaniam Sundaranar University, Tamil Nadu.

**साधने :** मूल्यांची रूजवणूक अभ्यासण्यासाठी प्रश्नावली.

1) विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली
2) शिक्षकांसाठी प्रश्नावली.

## संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनासाठी बीड जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालये किंवा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इयत्ता 12वीला पालि भाषा हा विषय शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची जनसंख्या विचारात घेण्यात आली होती.

कार्यवाहीचे टप्पे पुढीलप्रमाणे

1) माहिती संकलनासाठी प्रश्नावली हे साधन संशोधकाने तयार केले.
2) बीड जिल्ह्यातील उच्च माध्यमिक किंवा कनिष्ठ महाविद्यालयातील 800 विद्यार्थ्यांची निवड सुगम यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली.
3) विद्यार्थ्यांकडून मूल्यशिक्षण प्रश्नावली भरून घेतली.
4) प्रस्तुत माहिती सर्वेक्षण पद्धतीद्वारे संग्रहीत करण्यात आली.
5) प्राप्त माहितीचे तालीका व आलेखाद्वारे मांडणी करून विश्लेषण व वर्गीकरण केले.
6) विश्लेषणावरून अर्थनिर्वचन करण्यात आले.
7) निष्कर्ष काढून शिफारशी सुचविण्यात आल्या.

## कार्यवाहीची चर्चा :

संशोधनाच्या प्रश्नावलीमध्ये इयत्ता 12वीच्या पाठ्यपुस्तकातील गद्य, पद्य व स्थूलवाचनाच्या पाठामधून रूजविल्या जाणाऱ्या मूल्यांचा शोध घेवून त्यानुसार प्रश्नावलीमध्ये प्रश्न विचारण्यात आले होते. ह्या प्रश्नातून विद्यार्थ्यांच्यामध्ये जिज्ञासा, प्रेरणा व कुतूहल निर्माण झाले. त्यांना प्रश्नांमध्ये आपल्या अभ्यासक्रमातील अंतरंगामध्ये असलेल्या अनेक बाबी प्रश्नांच्या रूपाने समजून घेता आल्या. प्रश्नांचे स्वरूप हे सोपे, मध्यम व कठिण अशा स्वरूपाचे असल्याने सर्वच पातळीवरून विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली उपयुक्त ठरली. विचारण्यात आलेल्या प्रश्नामधून प्रत्येक पाठातील मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये रूजवणूक किती प्रमाणात झाली हे प्रश्नावलीतून आलेल्या प्रश्नाद्वारे समजण्यासाठी त्यांचे तालीकाकरण करून व आलेख काढून विश्लेषण व अर्थनिर्वचन केले.

## विश्लेषण :

प्रस्तुत संशोधनात उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचे उपयोजन इयत्ता 12वीच्या पालि पकासो या पाठ्यपुस्तकाद्वारे कसे झाले. याची मांडणी तालिकेमध्ये केल्यावर असे आढळून आले की, बीड जिल्ह्यातील पालि भाषा अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मानवतावादी मूल्यांची रूजवणूक झाली आहे. तसेच मूल्यांच्या रूजवणूकीमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचा दृष्टीकोन सारखाच आहे. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून आलेले निष्कर्षांची मांडणी केली. मानवतावाद ही मानसिक बाब असून ती विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून हे सिद्ध झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचे उपयोजन झाले आहे.

| अ.क्र. | | जनसंख्या | न्यादर्श निवड | शेकडेवारी |
|---|---|---|---|---|
| 1. | बीड जिल्ह्यातील पालि भाषा विषय असलेली उच्च माध्यमिक विद्यालये किंवा कनिष्ठ महाविद्यालये | 26 | 20 | 76.92 % |
| 2 | पालि विषयांचे अध्ययन करणारे विद्यार्थी | 2891 | 800 | 27.67 % |
| 3. | पालि विषयांचे अध्यापन करणारे नमुना प्रतिसादकांचे शिक्षक | 26 | 20 | 76.92 % |

## निष्कर्ष :

प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

1) उच्च माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांमध्ये तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्य रूजले आहे.
2) उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीवर तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचा प्रभाव पडला आहे
3) पालि पकासो या इयत्ता 12वीच्या पाठ्यपुस्तकाचा विद्यार्थ्यांकडून योग्य पद्धतीने उपयोग केला जात आहे.
4) तथागत बुद्धांचे मानवतावादी मूल्यशिक्षण हे आधुनिक काळातील लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये उपयोगी पडत आहे.
5) भारताच्या संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्त्वांचे उपयोजन होत आहे.

## परिणाम:

भारताच्या संविधानातील तत्वांचे उपयोजन करण्यासाठी तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यांचा उपयोग होतो. विद्यार्थ्यांना तथागत बुद्धांच्या मानवतावादी शिकवणूकीतून त्यांच्यामध्ये प्रत्येक गोष्टीतील कार्यकारणभाव जाणून घेण्याची क्षमता निर्माण होते. दैनंदिन जीवन जगतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या संकटांना, अडचणींना कसे सामोरे जावे याचे ज्ञान होते. स्वयं प्रकाशित व्हा या संदेशामुळे विद्यार्थ्यांना स्वत: कार्य करण्याची प्रेरणा मिळते. शिक्षकांचा, पालकांचा व एकंदरीत सर्वच नागरिकांचा सन्मान करावा ही शिकवण तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणातून मिळते.

## शिफारशी:

1) तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाचा सर्वच स्तरातील अभ्यासक्रमात समावेश व्हावा.
2) भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांची केंद्र व राज्यांच्या अभ्यासक्रमातून मांडणी व्हावी.
3) उच्च माध्यमिक विद्यालयातून मूल्यांच्या रूजवणूकीसाठी विविध सहशालेय कार्यक्रमांचे आयोजन करावे.
4) शिक्षकांनी आपल्या वर्तनातून मूल्यांची रूजवणूक करावी.
5) महाविद्यालये व विद्यापीठामध्ये तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणांचे विविध प्रबोधन वर्ग सुरू करावे.
6) पालकांनी आपल्या पाल्यांचे संगोपण करतांना पंचशील व अष्टांगिक मार्गाचा अवलंब करून जीवन जगावे.

### निष्कर्ष:

प्रस्तुत संशोधन हे पालि पकासो हा विषय अध्ययन करणाऱ्या इयत्ता 12वीच्या विद्यार्थ्यांच्यामधील तथागत बुद्धांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाच्या उपयोजनाची तपासणी करण्यासाठी करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये उपयोजित झालेल्या मूल्यशिक्षणासंबंधीत बाबींची तपासणी प्रश्नावली या साधनाद्वारे करण्यात आली. सर्वेक्षण पद्धतीने संग्रहीत केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढण्यात आले. विद्यालये, शिक्षक, पालक यांच्यासाठी शिफारशी सुचविण्यात आल्या. तसेच संविधानाच्या अंमलबजावणीसाठी उपयुक्त असलेले नागरिक निर्मितीची प्रक्रिया कशी होऊ शकते. याबाबत सविस्तर स्पष्टीकरण करण्यात आले.

## संदर्भ साहित्य :

1. मुळावकर, संतोष, व मुळावकर, कल्पना.2005 मूल्यशिक्षण: सुसंवाद, प्रथमावृत्ती नागपूर: विद्या प्रकाशन.
2. गोणारकर, संघमित्रा. 2009 बौद्ध शिक्षण प्रणाली, प्रथमावृत्ती, नांदेड: निर्मल प्रकाशन.
3. मुळे, रा.शं.,उमाठे, वि.तु. 1987 शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे. नागपूर: साहित्य प्रसार केंद्र.
4. पाटील, कृष्णकुमार. 2013 पालि पकासो इयत्ता बारावी , प्रथमावृत्ती, पुणे: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
5. आंबेडकर, भिमराव रामजी, 2000 बुद्ध आणि त्यांचा धम्म, नागपूर: समता प्रकाशन.
6. https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/61172.